दैनिक दिव्य मराठी, गुरुवार, १५ फेब्रुवारी २०१८

**दिव्य मराठी विशेष** स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेत वरिष्ठ महाविद्यालय गटातून पाटील याने पटकावला प्रथम क्रमांक

# भडगावात विद्यार्थ्यांनी केला स्वच्छतेचा जागर

प्रतिनिधी । भडगाव

...पंचायत समिती व सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा झाली. यात विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी जागर केला.

महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातर्फे सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता आणि पाणी बचतीविषयी जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. कनिष्ठ महाविद्यालय गट व वरिष्ठ महाविद्यालय गट अशा दोन स्वतंत्र गटांत ही स्पर्धा झाली. कनिष्ठ महाविद्यालय गटातून अपेक्षा वाल्मिक पाटील (आदर्श कन्या कनिष्ठ महाविद्यालय, भडगाव) हिने प्रथम, शीतल रवींद्र पाटील (आदर्श कन्या कनिष्ठ महाविद्यालय, भडगाव) हिने द्वितीय तर अक्षय रवींद्र मन्सी (सौ. सु. गि. पाटील कनिष्ठ महाविद्यालय, भडगाव) या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच वरिष्ठ महाविद्यालय गटातून ऋषिकेश राजेंद्र पाटील, कीर्ती अशोक अहिरे व प्राजक्ता जयदीप राजपूत (सर्व सौ. र. ना. देशमुख महाविद्यालय, भडगाव) या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेतील स्पर्धक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी विविध सामाजिक प्रश्नांवर प्रकाशझोत टाकला. तसेच जनजागृतीचा संदेश देखील दिला.



बोलताना विद्यार्थिनी.

या वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील, पंचायत समितीचे बी. बी. बोरसे, सी. एस. राठोड, सपना पाटील व अमोल पाटील हे उपस्थित होते. परीक्षक म्हणून डॉ. अतुल देशमुख, जी. आर. महाजन व बी. बी. बोरसे यांनी काम पाहिले. आयोजकांनी त्यांच्या विविध कार्यक्रम, उपक्रमाची माहिती या वेळी दिली. सात विद्यार्थ्यांचा विशेष सहभाग असल्याचे सांगण्यात आले. डॉ. बी. एस. भालेराव यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. अतुल देशमुख यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ, गुरुवार, दि. १५ फेब्रुवारी २०१८

# गांधी विचार परीक्षेत पूनम पाटीलचे यश

सकाळ वृत्तसेवा

भडगाव, ता. १४ : जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे घेण्यात आलेल्या गांधी विचार परीक्षेत येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कला शाखेतील तृतीय वर्षाची विद्यार्थिनी पूनम गुलाब पाटील हिने जळगाव जिल्ह्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले.

जळगाव येथील कांताई सभागृहात जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर यांच्या हस्ते पूनमला सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते. गांधी रिसर्च फाउंडेशनचे विश्वस्त दलिचंद जैन, जिल्हा पोलिस अधीक्षक दत्तात्रय कराळे उपस्थित होते. गांधी विचार परीक्षेचे समन्वयक म्हणून डॉ. सचिन हडोळतीकर यांनी काम पाहिले. या परीक्षेत महाविद्यालयातील ६० विद्यार्थी, प्राचार्य व प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला.



जळगाव : पूनम पाटील हिचा गौरव करताना जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर, शेजारी दलिचंद जैन, गुलाब पाटील, डॉ. सचिन हडोळतीकर आदी.

दैनिक सकाळ, गुरुवार, दि. ०८ फेब्रुवारी २०१८



भडगाव : 'युवारंग'मधील विजेत्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, प्रा. एस. आर. पाटील, प्रा. गुणवंत अहिरराव, शिवाजी पाटील आदी.

(बातमी : पान

# देशमुख महाविद्यालयाचे 'युवारंग'मध्ये यश


भडगाव, ता. ७ : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत जिल्हास्तरीय आंतरमहाविद्यालयीन युवारंग स्पर्धा अमळनेरच्या प्रताप महाविद्यालयात नुकतीच झाली. यात येथील [illegible] नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

महाविद्यालयाच्या अक्षय पाटील याने मिमिक्रीमध्ये प्रथम, धनश्री जोशी हिने रांगोळी स्पर्धेत तृतीय, प्रतीक्षा तवर हिने काव्यवाचन स्पर्धेत उत्तेजनार्थ दुसरे, धनश्री बाळकृष्ण जोशी हिने कोलाजमध्ये उत्तेजनार्थ दुसरे या [illegible] आणि, अक्षय पाटील, कुणाल मोरे, विशाल भोई, प्रसाद भावे व धनश्री जोशी (सर्व विजेते) यांनी उत्तेजनार्थ दुसरे पारितोषिक पटकावले. या सर्वांना विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. पी. डी. पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. बी. एस. अहिरराव, समिती सदस्य डॉ. अतुल देशमुख, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. डी. ए. [illegible], प्रा. मंजुषा जाधव, प्रा. आर. एस. गजभिये यांचे मार्गदर्शन मिळाले. [illegible] शेख यांचे सहकार्य लाभले.

दैनिक दिव्य मराठी, सोमवार, दि. १९ फेब्रुवारी २०१८

# शिक्षकामध्ये आई असणे गरजेचे : प्रा.वा.ना.आंधळे

प्रतिनिधी । भडगाव



समाजातील संवेदनशीलता हरवत चालली आहे. याचे कारण म्हणजे आई, वडील, शिक्षक यांनी केलेल्या संस्कारांचा परिणाम क्षीण होत आहे. शिक्षकामध्ये आई असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कवी प्रा. वा.ना.आंधळे यांनी केले.

ते सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वार्षिक पुरस्कार वितरण व गुणगौरव समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार दिलीप वाघ होते. प्रमुख पाहुणे म्हणून तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे चेअरमन संजय वाघ, व्हाइस चेअरमन वी. टी.जोशी, ज्येष्ठ संचालक नानासाहेब बबनराव देशमुख, दत्तात्रय पवार, विनय जकातदार, ग.ल.पूर्णपात्री, रवींद्र महाजन यांची विशेष उपस्थिती होती. शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा विभागातील विशेष नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. या वेळी उपप्राचार्य प्रा.एस.आर. पाटील, स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. ए. एन. भंगाळे हेदेखील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रम, कार्यक्रमांची माहिती दिली. पाहुण्यांचा परिचय व संदेशवाचन डॉ.अतुल देशमुख यांनी केले. पूनम पाटील व मधुरी पाटील यांनी स्वागतगीत सादर केले. रुपाली मोरे व मटाबाई नेरपगार यांनी सूत्रसंचालन केले.

दैनिक लोकमत, बुधवार, दि. २१ फेब्रुवारी २०१८

## भडगावात स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

भडगाव : पंचायत समिती भडगाव व रजनी देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्यातर्फे तालुकास्तरीय स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा घेण्यात आली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन.एन.गायकवाड होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्रा. एस.आर. पाटील, पंचायत समितीचे बी.बी.बोरसे, डी.एस.राठोड, सपना पाटील व अमोल पाटील उपस्थित होते. परीक्षक म्हणून डॉ.अतुल देशमुख, वी.आर.महाजन व बी.बी. बोरसे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन डॉ.बी.एस.भालेराव यांनी, तर आभारप्रदर्शन डॉ. अतुल देशमुख यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक जनशक्ती, मंगळवार, दि. ०६ फेब्रुवारी २०१८

# भडगावात विद्यार्थिनींसाठी स्वयंसिद्धा अभियान

## आत्मनिर्भरतेसाठी १० दिवस कराटे प्रशिक्षण; कराट्यामुळे आत्मविश्वास वाढण्यास मदत- मनोरे

। भडगाव ✍ प्रतिनिधी।

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगाव येथील युवती सभा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी १० दिवसीय स्वयंसिद्धा अभियान राबविण्यात आले. यात विद्यार्थिनींनी कराटे प्रशिक्षण घेऊन आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास व आत्मनिर्भरता येण्यासाठी या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



**५० विद्यार्थिनींचा सहभाग** ■ अभियानाच्या पहिल्या दिवशी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुणे म्हणून कराटे प्रशिक्षक संदीप मनोरे उपस्थित होते. विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.पी.डी.पाटील, युवती सभा समन्वयक प्रा. डॉ. चित्रा पाटील, प्रा. एस.एस.झाल्टे यावेळी उपस्थित होते. कराटे प्रशिक्षक संदीप मनोरे, कु.मेघना महाजन, कु. धनश्री महाजन, कु.स्नेहल महाजन, शुभम पाटील यांनी विद्यार्थिनींना प्रशिक्षण दिले. या शिबिरात ५० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर होणे काळाची गरज असून कराटेमुळे आत्मविश्वास वाढण्यास मदत होते, असे संदीप मनोरे यांनी सांगितले. यशस्वीतेसाठी प्रा.पी.डी.पाटील, प्रा. डॉ. चित्रा पाटील, क्रीडा संचालक प्रा. दिनेश तांदळे यांनी सहकार्य केले.

दैनिक दिव्य मराठी, गुरुवार, दि. ०८ फेब्रुवारी २०१८

# स्वयंसिद्धा अभियानातून आत्मनिर्भरतेचे दिले धडे

प्रतिनिधी । भडगाव

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील युवती सभा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी १० दिवसीय स्वयंसिद्धा अभियान राबवण्यात आले. यात विद्यार्थिनींनी कराटे प्रशिक्षण घेऊन आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न केला.

अभियानाच्या पहिल्या दिवशी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुणे म्हणून कराटे प्रशिक्षक संदीप मनोरे होते. विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. पी. डी. पाटील, युवती सभा समन्वयक प्रा. डॉ. चित्रा पाटील, प्रा. एस. एस. झाल्टे उपस्थित होते. कराटे प्रशिक्षक संदीप मनोरे, मेघना महाजन, धनश्री महाजन, स्नेहल महाजन, शुभम पाटील यांनी विद्यार्थिनींना प्रशिक्षण दिले. कराटे प्रशिक्षण घेतलेल्या काही विद्यार्थिनींनी प्रात्यक्षिक करून दाखवले. स्वयंसिद्धा अभियान यशस्वितेसाठी प्रा. पी. डी. पाटील, प्रा. डॉ. चित्रा पाटील, क्रीडा संचालक प्रा. दिनेश तांदळे यांनी सहकार्य केले.

दैनिक दिव्य मराठी, रविवार, दि. ३१ डिसेंबर २०१७

**शैक्षणिक** | भडगावच्या कार्यशाळेत शिक्षण सहसंचालक केशव तुपे यांचे मत

# उच्च शिक्षण क्षेत्रात प्राध्यापक, कर्मचारी दोन्ही घटक महत्त्वाचे

प्रतिनिधी | भडगाव

प्राध्यापक व कर्मचारी हे उच्च शिक्षण क्षेत्रातील दोन महत्त्वाचे घटक आहेत. प्रत्येक काम वेळेत केल्यास प्रशासन अधिक गतिमान होण्यास मदत होते. गतिमान प्रशासनासाठी कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असते, असे मत उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. केशव तुपे यांनी व्यक्त केले.

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता सुधार समितीच्या वतीने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी 'बेस्ट प्रॅक्टीसेस इन ऑफिस मॅनेजमेंट फॉर सिनियर कॉलेज' या विषयावर आधारित एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा झाली. या कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे कार्यध्यक्ष चेअरमन व्ही. टी. जोशी होते. प्रमुख पाहुणे म्हणून चाळीसगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद बिल्दीकर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन. गायकवाड यांनी प्रास्ताविक, तर प्रा. दीपक मराठे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एल. जी. कांबळे यांनी आभार मानले. 'बेस्ट प्रॅक्टीसेस इन रेकॉर्ड मॅनेजमेंट फॉर नॉन टिचिंग स्टाफ' या विषयावरील दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी उमविच्या अभियांत्रिकी परीक्षा विभागाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. मुश्ताक शेख होते. मोंगणाव येथील ज्ञानेश्वर महाविद्यालयातील डॉ. प्रमोद पवार यांनी वाचिक चर्चेची माहिती दिली. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून व्ही. टी. जोशी, पाचोरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एन. पाटील, एस. एस. चव्हाण उपस्थित होते. शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. दिनेश तांदळे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. अतुल देशमुख यांनी आभार मानले. कार्यशाळा यशस्वितेसाठी आयोजन समिती पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



कार्यशाळेचे उद्घाटन करताना उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक केशव तुपे, व्ही.टी. जोशी व अन्य मान्यवर.

## रेकॉर्ड मॅनेजमेंटविषयी मार्गदर्शन

'स्टाफ पॅटर्न अँड रोड फाॅर्म्युला फॉर एडेड सिनियर कॉलेज' या विषयावरील पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य रावसाहेब त्रिभुवन होते. व्ही.टी. जोशी यांनी शासकीय धोरण, शासन निर्णय व परिपत्रके याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. अतुल देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ए. एन. धंगाळे यांनी आभार मानले.

दैनिक दिव्य मराठी, गुरुवार, दि. ०८ फेब्रुवारी २०१८

## भडगावात देशमुख महाविद्यालयाचे युवारंगमध्ये यश

प्रतिनिधी । भडगाव

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत जिल्हास्तरीय आंतरमहाविद्यालयीन युवारंग स्पर्धा जेथील उत्तम महाविद्यालयात झाली. या स्पर्धेमध्ये विद्यापीठस्तरीय युवारंगसाठी रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश मिळवले.

अक्षय रंगराव पाटील याने मिमीक्रीमध्ये प्रथम, धनश्री बाळकृष्ण जोशी हिने रांगोळी स्पर्धेत तृतीय, प्रतिक्षा अशोक तवार हिने काव्यवाचन स्पर्धेत उत्तेजनार्थ दुसरे, धनश्री बाळकृष्ण जोशी हिने कोलाजमध्ये उत्तेजनार्थ दुसरे तर कीर्ती अशोक अहिरे, अक्षय रंगराव पाटील, सुगत दीपक मोरे, विशाल संजय भोई, प्रताप तानाजी धोबी व धनश्री बाळकृष्ण जोशी (सर्व विद्यार्थी) यांनी उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक पटकावले.

**विद्यार्थ्यांचा गौरव**

विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. पी. डी. पाटील, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. जी. एस. अहिरराव, समिती सदस्य डॉ. अतुल देशमुख, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. डी. ए. मस्की, प्रा. मंजुळे जाधव, प्रा. आर. एस. गजरिये यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले. सोहेल शेख यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील व प्राध्यापकांनी यशस्वी स्पर्धकांचा गौरव केला.

दैनिक देशदूत, गुरुवार, दि. ०८ फेब्रुवारी २०१८

## युवारंगमध्ये सौ.र.ना.देशमुख महाविद्यालयाच्या चमूने मारली बाजी

भडगाव । प्रतिनिधी

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव अंतर्गत जिल्हास्तरीय आंतरमहाविद्यालयीन युवारंग स्पर्धा नुकतीच उत्तम महाविद्यालय अमळनेर येथे संपन्न झाली.

या स्पर्धेमध्ये विद्यापीठस्तरीय युवारंगसाठी भडगाव येथील सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी यश मिळविले. अक्षय रंगराव पाटील याने मिमीक्रीमध्ये प्रथम, कु. धनश्री बाळकृष्ण जोशी हिने रांगोळी स्पर्धेत तृतीय, कु.प्रतिक्षा अशोक तवार हिने काव्यवाचन स्पर्धेत उत्तेजनार्थ दुसरे, कु. धनश्री बाळकृष्ण जोशी हिने कोलाजमध्ये उत्तेजनार्थ दुसरे तर कु.कीर्ती अशोक अहिरे, अक्षय रंगराव पाटील, सुगत दीपक मोरे, विशाल संजय भोई, प्रताप तानाजी धोबी व कु. धनश्री बाळकृष्ण जोशी (सर्व विद्यार्थी) यांनी उत्तेजनार्थ दुसरे पारितोषिक पटकावले. विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.पी.डी.पाटील, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.जी.एस.अहिरराव, समिती सदस्य डॉ. अतुल देशमुख, प्रा.शिवाजी पाटील, प्रा. डी. ए. मस्की, प्रा.मंजुळे जाधव, प्रा.आर. एस.गजरिये यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले. तसेच सोहेल शेख यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ.एन.एन.गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस.आर.पाटील व सर्व प्राध्यापक यांनी यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन केले.



दैनिक दिव्य मराठी, मंगळवार, दि. २६ डिसेंबर २०१७

# बाळद खुर्द येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर



प्रतिमेचे पूजन करताना दिव्या वाघिस्कर, सोबत डॉ. एन. एन. गायकवाड.

प्रतिनिधी । भडगाव

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे उद्घाटन प्राथमिक शाळेतील इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनी दिव्या तुकाराम वाघिस्कर हिच्या हस्ते करण्यात आले. हे शिबिर 'बेटी बचाव, बेटी पढाव' ही संकल्पना मध्यवर्ती ठेवून आयोजित करण्यात आले आहे.

२८ डिसेंबरपर्यंतच्या या शिबिरात पशुवैद्यकीय तपासणी, माती परीक्षण असे उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. 'स्पर्धा परीक्षांबाबत युवकांमधील जनजागृती', 'सोशल मीडियाचा समाजावर होणारा परिणाम' या विषयावर व्याख्यान होणार आहेत. अध्यक्षस्थानी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक नानासाहेब देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस.आर.पाटील, सुनील पाटील, मुख्याध्यापक टिकाराम पाटील उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व्ही. टी. बागुल यांनी प्रास्ताविक, तर प्रा. आर.एस.गजभिये यांनी सूत्रसंचालन केले. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. एस.एम.झाल्टे यांनी आभार मानले. दुपारी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची गटचर्चा, संभाषण कौशल्यावर आधारित कार्यक्रम झाले. या शिबिरात श्रमदानावर भर देण्यात आला आहे.

दैनिक पुण्यनगरी, बुधवार, दि. २७ डिसेंबर २०१७

# देशमुख महाविद्यालयात रासेयो शिबिराचे उद्घाटन

भडगाव : येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे उद्घाटन पार पडले. 'बेटी बचाव, बेटी पढाव' ही संकल्पना मध्यवर्ती ठेवून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

बाळद खुर्द येथे पार पडत असलेल्या या शिबिरात पशुवैद्यकीय तपासणी, माती परीक्षण असे उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच स्पर्धा परीक्षांबाबत युवकांमध्ये जनजागृती, सोशल मीडियाचा समाजावर होणारा परिणाम या विषयावर व्याख्यान होणार आहे. शिबिर उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थानी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक नानासाहेब देशमुख होते. उद्घाटन बाळद येथील प्राथमिक शाळेतील इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी दिव्या वाघिस्कर हिच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ.एन.एन.गायकवाड, उपप्राचार्य प्रा. एस.आर.पाटील, सुनील पाटील, मुख्याध्यापक टिकाराम पाटील यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व्ही.टी.बागुल यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आर.एस.गजभिये यांनी केले तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. एस.एम.झाल्टे यांनी मानले.



# गतिमान प्रशासनात कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे

## प्रा. डॉ. केशव तुपे : भडगाव येथील राज्यस्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन

सकाळ वृत्तसेवा

भडगाव, ता. २८ : 'उच्च शिक्षण क्षेत्रात प्राध्यापकांच्या बरोबरीने कर्मचाऱ्यांनी आपले योगदान दिले पाहिजे. प्राध्यापक व कर्मचारी हे दोन उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे प्रशासन गतिमान करण्यासाठी कर्मचाऱ्यांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे', असे प्रतिपादन उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक प्रा. डॉ. केशव तुपे यांनी केले.

येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता सुधार समितीतर्फे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी झालेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्‍घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'बेस्ट प्रॅक्टिसेस इन ऑफिस मॅनेजमेंट फॉर सोनिया कॉलेज' या विषयावर आधारित कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे व्हाइस चेअरमन व्ही. टी. जोशी होते. चाळीसगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद बिल्दीकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रा. डॉ. तुपे यांनी सांगितले, की प्रत्येक काम वेळेत केल्यास प्रशासन अधिक गतिमान होण्यास मदत होते. आपण आपल्या क्षेत्रातील माहिती सतत अद्ययावत ठेवायला हवी. कर्तव्य बजावताना कर्मचाऱ्यांवर शारीरिक व मानसिक ताण येण्याची शक्यता असते. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रकृतीला जपावे. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. दीपक मराठे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एल. जी. कांबळे आभार मानले.

### दोन सत्रांत झाली चर्चा

'स्मार्ट पॅटर्न ऑफ बेस्ट प्रॅक्टिसेस फॉर ॲटेंड सोनिकार कॉलेज' या विषयावरील पहिल्या सत्राला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य प्राचार्य त्रिभुवन अध्यक्षस्थानी होते. मात्र व्ही. टी. जोशी यांनी शासकीय धोरण, शासन निर्णय व परिपत्रकाविषयी विस्तारपूर्वक माहिती दिली. डॉ. अतुल यांनी सूत्रसंचालन तर प्रा. ए. एस. भगाळे यांनी आभार मानले. दुसरे सत्र 'बेस्ट प्रॅक्टिसेस इन रेकॉर्ड मॅनेजमेंट फॉर नॉन टीचिंग स्टाफ' या विषयावर झाले. 'उमवि'च्या अभियांत्रिकी परीक्षा विभागाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. मुश्ताक शेख अध्यक्षस्थानी होते. मोहगाव येथील डॉ. प्रमोद पवार यांनी तांत्रिक बाबींची सविस्तर माहिती दिली. शोभगावचे माजी प्राचार्य डॉ. गिरीश पवार समारोपाच्या अध्यक्षस्थानी होते. व्ही. टी. जोशी, प्राचार्य डॉ. बी. एन. पाटील व एस. एस. चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. दिनेश तांदळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अतुल देशमुख यांनी आभार मानले. कार्यशाळेस विविध महाविद्यालयांचे कर्मचारी उपस्थित होते.



भडगाव : कार्यशाळेचे दीपप्रज्वलन करून उद्‍घाटन करताना प्रा. डॉ. केशव तुपे. शेजारी व्ही. टी. जोशी, प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड आदी.

दैनिक सकाळ, शुक्रवार, दि. २९ डिसेंबर २०१८

दैनिक देशदूत, बुधवार, दि. ०४ ऑक्टोबर २०१७

# पोस्टर प्रदर्शन स्पर्धेत ४० विद्यार्थ्यांचे सादरीकरण

■ भडगाव, । प्रतिनिधी

येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय पोस्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जागतिक तापमान वाढीचे परिणाम, कारखान्यातून निघणाऱ्या दूषित घटकांचे व्यवस्थापन, अन्न भेसळ व त्याचे परिणाम या विषयांवर आधारित ४० विद्यार्थ्यांनी पोस्टरद्वारे सादरीकरण केले.



पोस्टर प्रदर्शन स्पर्धेत बक्षीस स्वीकारताना विद्यार्थिनी.

पोस्टर प्रदर्शन स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे संचालक दत्तात्रय पवार यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संचालक अ‍ॅड. आर.के.वाणी हे होते. यावेळी प्राचार्य डॉ. एन.एन.गायकवाड उपस्थित होते. प्रा.डॉ. गुणवंत सोनवणे, प्रा.डॉ.नंदकुमार देसले (किसान महाविद्यालय, पारोळा) व प्रा. अविनाश भंगाळे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.

स्पर्धेची विभागणी कनिष्ठ महाविद्यालय गट व वरिष्ठ महाविद्यालय गट अशी दोन गटात करण्यात आली होती. कनिष्ठ महाविद्यालय गटात गणेश शंकरराव साळुंखे (प्रथम), कु.जान्हवी सुरेश पाटील (द्वितीय), कु.ऋतुजा संजय कासार (तृतीय) तसेच वरिष्ठ महाविद्यालय गटात कु.प्राजक्ता जयदीप राजपूत (प्रथम), कु.मोक्षदा दिलीप पाटील (द्वितीय), वैभव चंद्रकांत पाटील (तृतीय) या विद्यार्थ्यांनी क्रमांक पटकावला. स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. एम.डी.बिर्ला यांनी केले. प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. एस.आर.पाटील यांनी तर आभार प्रा. एस.एम.झाल्टे यांनी मानले.

दैनिक लोकमत, शुक्रवार, दि. ०६ ऑक्टोबर २०१७

# भडगाव मध्ये जी.एस.टी.वर चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

भडगाव- रजनी देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कार्यालय तसेच मास्टरमाईंड फाउंडेशनतर्फे 'वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.) : कायदा, शंका व समाधान' या विषयावर चर्चासत्र झाले.

पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन व्ही.टी.जोशी अध्यक्षस्थानी होते. उद्घाटन कर उपायुक्त शरद पाटील यांनी केले. तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून राज्य कर अधिकारी एन.डी. भुसारी, एस.एस. सूर्यवंशी, एस.एस.फुलपगारे, राज्य कर निरीक्षक सुधीर पाटील, एस.एन. लढ्ढा, विक्रीकर निरीक्षक एस.एस. हिवाळे व एस.आर.पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एन.एन. गायकवाड, सूत्रसंचालन डॉ. बी.एस. भालेराव व प्रा.सरोज अग्रवाल यांनी, तर आभार प्रा.एस.आर.कोळी यांनी मानले.

दैनिक दिव्य मराठी, गुरुवार, दि. २८ सप्टेंबर २०१७

दिव्य मराठी विशेष | देशमुख महाविद्यालयातील चर्चासत्रात कर उपायुक्त शरद पाटील यांचे मार्गदर्शन

# जीएसटीचे चांगले परिणाम दिसतील

प्रतिनिधी | भडगाव

जीएसटीचा केवळ बागुलबुवा केला असून हा कायदा व्यापारी व सर्वसामान्यांना परवडणाराच आहे. जीएसटीमुळे व्यवहारात पारदर्शीपणा येणार आहे. या कायद्याचे चांगले परिणाम लवकरच दिसतील, असे कर उपायुक्त शरद पाटील यांनी जीएसटी विषयक चर्चासत्रात सांगितले.

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कार्यालय व मास्टरलाइन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'वस्तू व सेवा कर (जीएसटी) कायदा, शंका व समाधान' या विषयावर तालुकास्तरीय चर्चासत्र झाले. अध्यक्षस्थानी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे व्हाइस चेअरमन व्ही.टी.जोशी होते. शासनाच्या वस्तू सेवा कर योजनेच्या विशेष योजनेत ज्यांना रजिस्ट्रेशन करायचे, त्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन पाटील यांनी केले. उद्योजक सुयोग जैन यांनी व्यापाऱ्यांच्या समस्या व त्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांबाबत मार्गदर्शन केले. तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून राज्य कर अधिकारी एन.डी. भुसारी, एस.एस.सूर्यवंशी, कर अधिकारी एस.एस.फुलपगारे, सुधीर पाटील, एस.एन.तडवी, एस.एस.हिवाळे, एस.आर. पाटील उपस्थित होते. मेडिकल असोसिएशनचे चेअरमन सुरेश भंडारी यांची विशेष उपस्थिती होती. प्राचार्य डॉ.एन.एन.गायकवाड यांनी प्रास्ताविक, तर अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी.एस.भालेराव व प्रा.सरोज अग्रवाल यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस.आर. कोळी यांनी आभार मानले. डॉ. सचिन हडोळतीकर, प्रा. श्रावण कोळी, प्रा. जनार्दन देवरे, प्रा. भूषण वानखेडे, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



जीएसटी विषयक चर्चासत्रात बोलताना शरद पाटील.

दैनिक तरुण भारत, गुरुवार, २८ सप्टेंबर २०१७

# भडगाव महाविद्यालयात जी.एस.टी.वर तालुकास्तरीय चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा**
**भडगाव, २७ सप्टेंबर :**

भडगाव येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कार्यालय जळगाव तसेच मास्टरलाईन फाउंडेशन भडगावतर्फे वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.): कायदा, शंका व समाधान' या विषयावर तालुकास्तरीय चर्चासत्र झाले.

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायद्याच्या आपसमेळ योजनेची (कॉम्प्लिमेंट ह्लतगामी) भडगाव शहर व तालुक्यातील लहान व्यापारी यांना अधिकाधिक माहिती व्हावी आणि त्याचा लाभ घेता यावा या उद्देशाने हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन व्ही.टी.जोशी होते. उद्घाटन शरद पाटील (कर उपायुक्त) यांच्या हस्ते झाले.



शरद पाटील यांनी केंद्र सरकारने लागू केलेल्या वस्तू व सेवा कर कायदा याविषयी विस्ताराने माहिती दिली. विविध व्यवसाय व सेवांच्या बाबतीत या कायद्याचे स्वरूप कसे आहे, याचे विश्लेषण केले.

यावेळी त्यांनी या कायद्याविषयीच्या व्यापारी बांधवांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली.

तज्ज्ञ मार्गदर्शक एन.डी.भुसारी व एस.एस.सूर्यवंशी (राज्य कर अधिकारी), एस.एस.फुलपगारे (राज्य कर अधिकारी), सुधीर पाटील (राज्य कर निरीक्षक), एस.एन.तडवी व एस.एस. हिवाळे आणि एस.आर.पाटील (विक्रीकर निरीक्षक) आदी उपस्थित होते.

मास्टरलाईन फाउंडेशनचे संचालक सुयोग जैन व भडगाव तालुका मेडिकल असोसिएशनचे चेअरमन सुरेश भंडारी यांची उपस्थिती होती.

दैनिक सकाळ, सोमवार, दि. ९ ऑक्टोबर २०१७

# भडगावला 'नॅक पूर्वमूल्यांकन' कार्यशाळेत मार्गदर्शन

सकाळ वृत्तसेवा



भडगाव : मार्गदर्शन करताना डॉ. एस. एस. धर्माधिकारी. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड आदी.

भडगाव, ता. ८ : राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन परिषद (बंगळूर- नॅक) या संस्थेद्वारे येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे मूल्यांकन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर येथे मार्गदर्शन कार्यशाळा झाली.

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय या मूल्यांकनास २०१९ मध्ये सामोरे जाणार आहे. त्यादृष्टीने महाविद्यालयाचा वार्षिक गुणवत्ता अहवाल 'नॅक'ला सादर करण्यात आला आहे. नॅकला सामोरे जाताना पूर्वतयारी म्हणून महाविद्यालयात नॅक सुकाणू समितीचे सदस्य डॉ. एस. एस. धर्माधिकारी (माजी प्राचार्य, योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई) यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते म्हणाले की, ग्रामीण भागातील महाविद्यालयालासुद्धा नॅकचा चांगला दर्जा प्राप्त करता येऊ शकतो. त्यासाठी अनेक नवीन बाबींचा स्वीकार महाविद्यालयाने करायला हवा. कार्यक्रमपत्रिका उपक्रमांना नॅकच्या नवीन प्रणालीमध्ये महत्त्व देण्यात आले आहे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून महाविद्यालयाची वाटचाल असायला हवी. महाविद्यालय व समाज यांच्यामध्ये संबंध प्रस्थापित व्हायला हवे. 'लॅब टू लॅन्ड' अशाप्रकारे महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा फायदा समाजाला व्हायला हवा. पारंपरिक दृष्टिकोन सोडून नवीन पद्धतीने विचार केला तर महाविद्यालयाला त्याचा फायदा होतो. डॉ. धर्माधिकारी यांनी नॅकसंबंधी सर्व तांत्रिक बाबींचे अत्यंत सखोलपणे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड हे होते. नॅक समन्वयक प्रा. ए. एन. भंगाळे, प्रा. एल. जी. कांबळे यांची याप्रसंगी उपस्थिती होती. प्रा. एस. एन. हाल्दे यांनी आभार मानले.

दैनिक दिव्य मराठी, बुधवार, दि. ११ ऑक्टोबर २०१७

# नॅकच्या नवीन प्रणालीत शैक्षणिक उपक्रमांवर भर

**भडगाव** । नॅकला सामोरे जाताना पूर्वतयारी म्हणून महाविद्यालयात नॅक सुकाणू समितीचे सदस्य तथा अंबेजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एन.एस.धर्माधिकारी यांचे सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एन.एन.गायकवाड होते. डॉ. एन.एस.धर्माधिकारी यांनी ग्रामीण भागातील महाविद्यालयालासुद्धा नॅकचा चांगला दर्जा प्राप्त करता येऊ शकतो, असे सांगितले. प्रा. ए.एन.भंगाळे, प्रा. एल.जी.कांबळे उपस्थित होते.

दैनिक सकाळ, रविवार, दि. २४ सप्टेंबर २०१७

# योग्य नियोजनातून यशोशिखर गाठावे

## सुनील देशमुख : भडगाव महाविद्यालयात व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा



भडगाव : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुनील देशमुख. शेजारी उपप्राचार्य एस. आर. पाटील आदी. (छायाचित्र : सुधाकर पाटील)

भडगाव, ता. २३ : 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांबद्दल फारशी माहिती नसली तरी त्यांनी या परीक्षा देण्यासाठी अभ्यासाचे योग्य नियोजन करून आपले ध्येय निश्चित केले, तर अशा परीक्षांमध्ये यश हमखास मिळवता येते. त्यामुळे योग्य नियोजनातून यश गाठावे,' असे आवाहन जळगावच्या युनिक ॲकॅडमीचे समन्वयक सुनील देशमुख यांनी केले.

येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सामान्यज्ञान परीक्षा समितीतर्फे आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील होते. श्री. देशमुख यांनी सांगितले, की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास नसतो. मात्र, या परीक्षांबाबत योग्य माहिती घेऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो. त्यामुळे दररोज नियमितपणे वर्तमानपत्रांचे वाचन करावे. दिवसाचे वेळापत्रक तयार करून वेळेचे योग्य नियोजन करावे. 'यूपीएससी' व 'एमपीएससी' परीक्षांचा अभ्यासक्रम व त्यांची तयारी करण्यासाठी कोणकोणती पुस्तके वाचावीत, याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. पालेकी गोपाल येदाणे यांची विशेष उपस्थिती होती. सामान्यज्ञान परीक्षा समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शिवाजी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्रदीप वाघ यांनी आभार मानले.

दैनिक सकाळ, सोमवार, दि. २५ सप्टेंबर २०१७

# नोटबंदीचा निर्णय फसला : प्रा. मुसळे

## भडगावला देशमुख महाविद्यालयात 'जीएसटी'वर मार्गदर्शन

सकाळ वृत्तसेवा

भडगाव, ता. २४ : नोटबंदीमुळे गरिबांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नोटबंदीमुळे काळा पैसा बाहेर येईल, भ्रष्टाचाराला आळा बसेल, आतंकवाद व नक्षलवाद कमी होण्यास मदत होईल, असे सरकारने नोटबंदीचा निर्णय जाहीर करताना म्हटले होते. मात्र, आजची स्थिती पाहता नोटबंदीचा निर्णय फसला आहे, असे मत प्रा. जयराम मुसळे (बार्शी, सोलापूर) यांनी येथे व्यक्त केले.

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये वाणिज्य व अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित 'नोटबंदी व जीएसटी' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. ते म्हणाले की, नोटबंदीमुळे सर्वसामान्य जनतेला कितीतरी दिवस तासनतास बँकांच्या रांगेत उभे राहावे लागले. काहींवर तर जीव गमावण्याची वेळ आली. बंद झालेल्या किती नोटा रिझर्व्ह बँकेत परत आल्याचा निश्चित आकडा रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरनासुद्धा सांगता आला नाही. दहशतवादी हल्ले थांबले नाही किंवा नक्षलवादसुद्धा कमी झाला नाही. भ्रष्टाचाराची नवनवीन प्रकरणे अजूनही बाहेर येतच आहेत. उलट देशाचा विकासाचा दर खाली आला. त्यामुळे नोटबंदीचा निर्णय अपयशी ठरला असेच म्हणावे लागेल. उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रा. डॉ. पालेराव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सचिन हडोळतीकर यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी प्रा. एस. ए. कोळी, प्रा. जी. डी. देवरे व प्रा. एस. आर. कोळी यांनी सहकार्य केले.



भडगाव : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. जयराम मुसळे. (छायाचित्र : सुधाकर पाटील)

दैनिक सकाळ, शुक्रवार, दि. २९ सप्टेंबर २०१७

# भडगावला 'जीएसटी'बाबत मार्गदर्शन

## देशमुख महाविद्यालयात तालुकास्तरीय चर्चासत्र

सकाळ वृत्तसेवा



भडगाव : कार्यक्रमात दीपप्रज्वलन करताना शरद पाटील. शेजारी डॉ. एन. एन. गायकवाड, सुयोग जैन, सुरेश भंडारी आदी.

(छायाचित्र : सुधाकर पाटील)

भडगाव, ता. २८ : येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र वस्तू व सेवाकर कार्यालय जळगाव तसेच केंद्रीत मास्टरलाइन फाउंडेशन यांच्यातर्फे 'वस्तू व सेवाकर (जीएसटी) : कायदा, शंका व समाधान' या विषयावर तालुकास्तरीय चर्चासत्र नुकतेच झाले.

हे वस्तू व सेवा कर कायद्याची शहर व तालुक्यातील लहान व्यापाऱ्यांना माहिती व्हावी आणि त्याचा लाभ घेता यावा या उद्देशाने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे व्हाइस चेअरमन व्ही. टी. जोशी अध्यक्षस्थानी होते. कर उपायुक्त शरद पाटील यांच्याहस्ते उद्घाटन झाले. त्यांनी केंद्र सरकारने लागू केलेल्या वस्तू व सेवा कर कायद्याविषयी माहिती दिली. विविध व्यवसाय व सेवांच्या बाबतीत या कायद्याचे स्वरूप कसे आहे, याचे विश्लेषण त्यांनी केले. यावेळी व्यापारी बांधवांनी विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून राज्य कर निरीक्षक एन. डी. भुसारी, कर अधिकारी एस. एस. सूर्यवंशी, एस. एस. फुलपगारे, कर निरीक्षक सुधीर पाटील, एस. एन. तडवी, एस. एस. शिंपाळे व एस. आर. पाटील हे उपस्थित होते. मास्टरलाईन फाउंडेशनचे संचालक सुयोग जैन व भडगाव तालुका मेडिकल असोसिएशनचे चेअरमन सुरेश भंडारी यांची विशेष उपस्थिती होती. सुयोग जैन यांनीही मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. बी. एस. भालेराव व प्रा. सतीश अग्रवाल यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. आर. कोळी यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सचिन हडोळतीकर, प्रा. श्रावण कोळी, प्रा. जनार्दन देवरे, प्रा. भूषण वानखेडे व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

दैनिक दिव्य मराठी, रविवार, दि. ०३ सप्टेंबर २

दिव्य मराठी विशेष भडगावातील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख महाविद्यालयातील कार्यशाळेत जयदीप पाटील यांचे प्रतिपादन

# ज्या क्षेत्रात जाल त्यात आपला ठसा उमटवा

प्रतिनिधी | भडगाव

आपल्या क्षमता ओळखून त्यानुसार परिश्रम घेतले, तर यश निश्चित मिळते. ज्या क्षेत्रात जाल त्या क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवला पाहिजे. तेव्हाच आपले कुटुंब, गाव व देशाचे नाव उज्ज्वल होईल. आवडते काम केले, तर समाधान नक्कीच मिळते. झोकून दिलेल्या कामातील आनंद हा अवर्णनीय असतो, असे प्रतिपादन येथील जळगाव येथील दीपस्तंभचे मार्गदर्शक व नोबेल फाउंडेशनचे संचालक जयदीप पाटील यांनी केले.

सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा झाली. याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर पाचोरा येथील स्पर्धा परीक्षातज्ज्ञ राजेंद्र चिंचोले, पोलिस निरीक्षक धनंजय येरुळे व डी. बी. कोळी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते. दुसऱ्या सत्रात राजेंद्र चिंचोले, डी. बी. कोळी, महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी व पोलिस उपनिरीक्षक मुस्तफा मिर्झा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## विविध योजनांचा शुभारंभ

याप्रसंगी शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने विविध विद्यार्थीभिमुख योजनांचा शुभारंभ करण्यात आला. वनडे वन स्टी स्किम, अर्न अँण्ड लर्न स्किम, विचारधन या योजनांमधून गरीब व होतकरू विद्यार्थी, खेळाडूंना निश्चित लाभ होईल, अशी अपेक्षा मान्यवरांनी व्यक्त केली. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. या वेळी उपप्राचार्य एस. आर. पाटील, प्रा. एल. जी. कांबळे, डॉ. सी. एस. पाटील, डॉ. एन. व्ही. चिमणकर, प्रा. नेहा मालपुरे आदी उपस्थित होते. आरती राठोड, निकीता महाजन, प्रतीक्षा ततार व रोशन पाटील या खेळाडू विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक प्रा. दिनेश तांदळे यांनी प्रास्ताविक, तर प्रा. दीपक मराठे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सचिन हडोळतीकर यांनी आभार मानले. मान्यवरांचा परिचय डॉ. अतुल देशमुख यांनी करून दिला. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी रवींद्र महाजन व खेळाडूंनी परिश्रम घेतले.



भडगाव येथील कार्यशाळेत मान्यवरांच्या सत्कारप्रसंगी जयदीप पाटील, राजेंद्र चिंचोले, पोलिस निरीक्षक धनंजय येरुळे, डी.बी.कोळी आदी.

# क्रीडा दिनानिमित्त विविध योजनांचा प्रारंभ

## भडगाव येथील महाविद्यालयात कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा



भडगाव : क्रीडा विभागाच्या योजनांचे फलक अनावरण करताना प्राचार्य एन. एम. गायकवाड, प्रा. दिनेश तांदळे, प्रा. दीपक मराठे आदी. (छायाचित्र : सुधाकर पाटील)

भडगाव, ता. ३ : येथील रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

दीपस्तंभ फाउंडेशनचे संचालक जयदीप पाटील, राजेंद्र चिंचोले, भडगाव पोलिस ठाण्याचे निरीक्षक धनंजय एरंडे व डी. बी. कोळी आदी यावेळी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड अध्यक्षस्थानी होते.

जयदीप पाटील म्हणाले, की प्रत्येकाने परिस्थितीचा अंदाज घेऊन वाटचाल करायला हवी. आपल्यातील क्षमता ओळखून परिश्रम घेतले तर यश निश्चित मिळते. प्रत्येकानेच अधिकारी व्हावे, अशी अपेक्षा करणे योग्य नाही. परंतु ज्या क्षेत्रात जाल त्या क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटविला पाहिजे. तेव्हाच आपले कुटुंब, गाव व देशाचे नाव उज्ज्वल होईल. आवडते काम केले तर समाधान नक्कीच मिळते. झोकून देऊन काम केले तर मिळणारा आनंद हा अवर्णनीय असतो. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात राजेंद्र चिंचोले, डी. बी. कोळी तसेच महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी व पोलिस उपनिरीक्षक मुस्तफा मिर्झा यांची मार्गदर्शनपर व्याख्याने झाली.

शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागातर्फे विविध विद्यार्थिभिमुख योजनांचा मान्यवरांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. 'वन डे वन रुपी स्कीम', 'अर्न अँड लर्न स्कीम', 'विचारधन योजना' या योजनांमधून गरीब व होतकरू विद्यार्थी खेळाडूंना निश्चित लाभ होईल, असा आशावाद मान्यवरांनी व्यक्त केला. उपप्राचार्य एस. आर. पाटील, प्रा. एल. जी. कांबळे, डॉ. सी. एस. पाटील, डॉ. एन. व्ही. चिमणकर, प्रा. नेहा मालपुरे यांची याप्रसंगी उपस्थिती होती. आरती राठोड, निकिता महाजन, प्रतीक्षा ततार व रोशन पाटील या खेळाडू विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. दीपक मराठे यांनी सूत्रसंचालन केले. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. दिनेश तांदळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन हडोळतीकर यांनी आभार मानले. डॉ. अतुल देशमुख यांनी परिचय करून दिला. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी रवी महाजन व विभागाच्या खेळाडूंनी परिश्रम घेतले.

दैनिक देशदूत, रविवार, दि. ०३ सप्टेंबर २०१७



# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशमुख महाविद्यालयात कार्यशाळा

■ भडगाव, । दि. २ । प्रतिनिधी

येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून दीपस्तंभ फाउंडेशनचे संचालक जयदीप पाटील, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र संचालक राजेंद्र चिंचोले, पोलीस निरीक्षक धनंजय येरुळे व डी. बी. कोळी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड हे होते. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात राजेंद्र चिंचोले, डी. बी. कोळी तसेच महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी व पोलीस उपनिरीक्षक मुस्तका मिर्झा यांची व्याख्याने झाली. यावेळी शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने विविध विद्यार्थिभिमुख योजनांचा शुभारंभ करण्यात आला. उपप्राचार्य एस. आर. पाटील, प्रा. एल. जी. कांबळे, डॉ. सी. एस. पाटील, डॉ. एन. व्ही. चिमणकर, प्रा. नेहा मालपुरे यांची याप्रसंगी उपस्थिती होती. कु. आरती राठोड, कु. निकीता महाजन, कु. प्रतिक्षा ततार व रोशन पाटील या खेळाडू विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. दीपक मराठे यांनी प्रास्ताविक शारीरिक शिक्षण संचालक प्रा. दिनेश तांदळे यांनी तर आभार डॉ. सचिन हडोळतीकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. अतुल देशमुख यांनी करून दिला. यशस्वितेसाठी रविंद्र महाजन व विभागाच्या खेळाडूंनी परिश्रम घेतले.

दै. दिव्य मराठी दि. १०/०९/२०१८

# वित्तीय साक्षरता काळाची गरज; डॉ.अनिल जाधव यांचे प्रतिपादन

**भडगाव** | वित्तीय साक्षरतेने गरिबीतून मुक्ती मिळू शकते. बचतीच्या योग्य सवयी आत्मसात करून गुंतवणुकीच्या विविध माध्यमांतून आपले उत्पन्न वाढवता येते. अनावश्यक खर्च टाळून वेगवेगळ्या माध्यमातून गुंतवणूक करून आपले उत्पन्न वाढवले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रिसोर्स पर्सन डॉ. अनिल जाधव यांनी केले. ते भडगाव येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित वित्तीय साक्षरता कार्यशाळेत बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य एस.आर.पाटील होते. कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.बी.एस. भालेराव यांनी मांडली. डॉ. सचिन हडोळतीकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. प्रा.श्रावण कोळी यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा. जनार्दन देवरे यांनी आभार मानले.